दि:25 जानेवारी,2014

# विरोध करण्याचा अधिकार

-अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

शांतिपूर्ण प्रकाराने निषेध नोंदवण्याचा अधिकार अधिकृत राजनैतिक हालचालींचा एक भाग आहे. अभिव्यक्तीचा एक प्रकार विरोध करणे आहे. निश्चितच प्रत्येक नागरिकाला असहमति दर्शवण्याचा अधिकार आहे, विरोध असहमतीचा एक प्रकार आहे.

एका निर्वाचित सरकारच्या प्रमुखाला हा अधिकार मिळाला नाही पाहिजे? हा एक असा प्रश्न आहे जो दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी विचारला आहे. एका निर्वाचित सरकारच्या काही जबाबदा-या आहेत आणि त्यांच्या प्रमुखाचे कर्तव्य आहे की, त्यांने संविधानानुसार शासन चालवावे. जर आम्ही दिल्लीत एएपी सरकारने जे काही केले त्याची विस्तृत चौकशी केली तर या प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळेल. मंत्री सचिवालयाला सोडून आले. त्यांनी पोलिसांना अडचणीत टाकले आणि अशा ठिकाणी धरण्यावर बसले की जिथे याची परवानगी नव्हती. त्यांनी कायद्याचे उल्लंघन केले. त्यांनी आपल्या समर्थकांना संदेश पाठवून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यास सांगितले. सरकारच्या प्रमुखाने अराजकतेची पाठराखण केली. त्यांनी पोलिसांना सुट्टी वर जाण्यास, आपली वर्दी सोडण्यास आणि विरोधात सामील होण्यास सांगितले. त्यांनी धमकी दिली की, त्यांचे लाखो समर्थक राजपथाकडे मार्च करत प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी परेड मध्ये गोंधळ घालतील. जर दिल्ली पोलिसांनी त्यांच्या आवाहना अनुरुप काम केले होते आणि आपली ड्यूटी सोडून राजपथावर प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी आपल्या समर्थकांबरोबर गोंधळ घातला असता, तर काय असे बोलले जाते की, संविधानानुसार शासन केले जाते. या प्रश्नाचे उत्तर निश्चितच 'नाही' असे आहे.

राजघाटावर धरण्यावर बसणे आणि पोलिसांना असे सांगणे की आपली ड्यूटी सोडून प्रजासत्ताक दिनाला बाधा पोचवतात. दोघांमध्ये खुप अंतर आहे. मला खात्री आहे की श्री अरविंद केजरीवाल ही गोष्ट समजतील.